इचलकरंजी महानगरपालिका, इचलकरंजी.

वाहन विभाग, जा.क्र.वाहन/ २३५ /२०२५

दि. २४ /०६/२०२५

# सर्क्युलर

इचलकरंजी महानगरपालिकेच्या सर्व नोंदणीकृत मक्तेदार व संस्था नोंदणी प्रमाणपत्र पुरवठाधारक यांना कळविणेत येते की, इचलकरंजी महानगरपालिकेकरिता इनोव्हा, कार व जीप प्रकारातील वाहने त्यावरील वाहनचालक व इंधनासह भाडेतत्वावर पुरविणे कामाचे अंदाजपत्रक तयार करणेबाबतच्या कोटेशन दरासंबंधी मा. उपायुक्त यांचे दि.२४/०६/२०२५ अन्वये महानगरपालिका वेबसाईटवरून तसेच नोटीस बोर्डावर प्रसिद्धी देऊन दरपत्रक / कोटेशन मागविणेस मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार सदरचे काम आपण किती व कोणत्या दराने करणेस तयार आहात याबाबतचे सोबत जोडले तक्त्याखाली नमूद केले सूचनेप्रमाणे आपले दरपत्रक / कोटेशन खालील अटीस अधीन राहुन देणेचे आहे.

१. प्रस्तुतकामी महानगरपालिकेने ठरवून दिलेल्या नमुन्यात दर देणेत यावेत.

२. वाहने भाडेतत्वावर पुरवठा करावयाचे दर सर्व टॅक्ससह असली पाहिजे किंवा त्याबाबत तसा स्पष्ट खुलासा असला पाहिजे.

३. प्रस्तुतकामी बाजारातून आलेले दर हे फक्त अंदाजपत्रक तयार करणेस तसेच अंदाजपत्रकिय तरतूद निश्चित करणेसाठी मर्यादित राहतील.

४. आलेले दरपत्रक / कोटेशन पैकी कोणताही कमीचा अगर जास्तीचा मंजूर अगर नामंजूर करणेचा अधिकार महानगरपालिकेने राखून ठेवला आहे. त्याची कोणतीही कारणे दिली जाणार नाही.

५. सदर कामाची पूर्तता महानगरपालिकेचे सुचनेप्रमाणे करणे बंधनकारक राहील.

६. कामासंबंधी अधिक माहिती वाहन विभागाकडे मिळेल.

तरी सदरचे सर्क्युलर मधील सोबत जोडले तक्त्यानुसार दर नमूद करून सिलबंद दरपत्रक/ कोटेशन दि.२५/०६/२०२५ ते दि.२६/०६/२०२५ अखेर सांय.५.०० वाजेपर्यंत महानगरपालिकेच्या वारनिशी विभागाकडे देणेची आहेत. प्राप्त सिलबंद दरपत्रक/ कोटेशन शक्यतो दि.२६/०६/२०२५ रोजी ०५.३० वाजता उघडणेत येतील त्यावेळी संबंधीतांनी समक्ष हजर रहावे.

प्रशांत आरगे
प्र. वाहन अधिक्षक

| अ.क्र. | मक्तेदार नाव | सही |
|---|---|---|
| १) | | |
| २) | | |
| ३) | | |
| ४) | | |
| ५) | | |
| ६) | | |

**प्रत नोटीस बोर्डावर लावणे कामी.**

टिप :-

१) सर्व दर संबंधित वाहन, त्यावरील वाहनचालक व त्यासाठीचे इंधन यासह देणेत यावेत.

२) मक्तेदाराने दर भरताना जीएसटी शिवाय व अनुज्ञेय असलेले सर्व करांसह भरावेत. अनुज्ञेय जीएसटी अतिरीक्तपणे येईल.

३) वरील दर देताना इनोव्हा, एर्टीगा (7 Seater) तसेच जीप व कार प्रकारातील (5 Seater) इ. वाहनांचे दर वेगवेगळे देणेत यावेत.

४) तसेच दर देताना प्रतिदिन १२ तास (८० कि.मी.) प्रमाणे दर देण्यात यावेत.

५) वातानुकुलित व विना वातानुकुलित वाहनांचे दर वेगवेगळे देणेत यावेत.

६) कर वसुलीकामी वापरणेत येणाऱ्या नॉन एसी जीप प्रकारातील वाहनांसाठी आवश्यकते नुसार लागणारे वाहनावर स्पीकर सेट, ॲम्प्लीफायर व माईक इ. यंत्रणेसह वाहन पुरविणेचे दरासह देणेत यावेत.

७) सदरची वाहने पुरविताना वाहन शहराबाहेर प्रवास करताना द्यावयाचा टोल, पार्किंग चार्जेस तसेच स्पीड लिमिट दंड इ. बाबी संबंधित मक्तेदाराने भरणे बंधनकारक राहील.

प्रशांत आरगे
प्र. वाहन अधिक्षक

# वाणिज्यिक लिफाफा

(निविदा फॉर्म क्रमांक - २)

इचलकरंजी महानगरपालिकेकरिता कार व जीप प्रकारातील वाहने त्यावरील वाहनचालक व इंधनासह वार्षिक भाडेतत्वावर पुरविणे.

निविदाधारकाचे नाव व पत्ता :- ______________________________

______________________________

| वाहन प्रकार | संख्या | प्रतिदिन (८० कि.मी.) करिता वाहन, इंधन व वाहनचालकासह | प्रति कि.मी. वाहन, इंधन व वाहनचालकासह | मासिक २५०० कि.मी. करिता दर | २५०० कि.मी. पेक्षा ज्यादा प्रति कि.मी. करिता दर |
|---|---|---|---|---|---|
| १) इनोव्हा क्रिस्टा (वातानुकुलित) | १ | | | | |
| २) स्विफ्ट डिझायर, ह्युंदाई ॲक्सेंट, इटीऑस सिडान (वातानुकुलित) | १ | | | | |
| ३) जीप, तवेरा, सुमो, एर्टीगा व तत्सम / (विनावातानुकुलित) | १ | | | | |

**टीप :- जीप सुमो ,तवेरा यांचे दर स्पिकर, ॲम्प्लीफायर व माईक सुविधेसह देण्यात यावे.**

दि. :- / / २०२५

निविदाधारकाची स्वाक्षरी
( नाव, शिक्का व पूर्ण पत्ता )